श्री. वैभव संजय कांबळे, परिचर, प्रा. आ. केंद्र ब्राम्हणवाडा, ता. अकोले यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी व सादरकर्ता अधिका-याची नेमणुक करणे.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-४/१२४/ २८० /२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरीत नमुद केल्याप्रमाणे

वाचा- १. तपासणी समितीकडील तपासणी अहवाल दिनांक ०५/०६/२०२५
२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील वुसली नोटीस जा.क्र.साप्रवि/आस्था-३/६६७/२०२५, दिनांक ०२/०७/२०२५
३. तपासणी समितीकडील सुधारीत तपासणी अहवाल दिनांक ३०/०९/२०२५
४. कार्यालयीन पत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-४/१२४/६२६/२०२५ दिनांक १८/१२/२०२५
५. वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र ब्राम्हणवाडा, ता. अकोले याचेकडील १ ते ४ जा.क्र.आरोग्य /आस्था/०९/२०२६ दिनांक १२/०१/२०२६
६. कार्यालयीन ज्ञापन/दोषारोपपत्र जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/१२४/१३७/२०२६ दि. ३१/०३/२०२६
७. श्री. कांबळे, परिचर यांचा खुलासा दि. ०९/०४/२०२६
८. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६.३ नुसार
९. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६.५ नुसार

श्री. वैभव संजय कांबळे, परिचर या पदावर प्रा. आ. केंद्र ब्राम्हणवाडा, ता. अकोले, जि. प. अहिल्यानगर येथे कार्यरत असताना संदर्भ क्र. १ व ३ अन्वये तपासणी समितीकडील अहवालानुसार सेवार्थ प्रणालीमधुन बेसिक एरियर टॅबचा वापर करून रक्कम रू. ४९२०३०/- अक्षरी रूपये चार लक्ष ब्यानौव हजार तीस मात्र एवढा शासकीय निधी स्वत:चे नावे बँक खात्यामध्ये जमा केलेला आहे. सदर निधी माहे एप्रिल-२०२३ मध्ये रू. ४९२०३०/- मात्र आहारीत केलेला आहे. तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक यांचे मदतीने खोटे दस्तऐवज तयार करून पंचायत राज सेवार्थ प्राणालीचा संगणमताने गैरवापर करून शासकीय निधीचा वैयक्तीक स्वार्थी हेतुने गैरव्यवहार करून आर्थिक अपहार केल्याचे माहे मार्च-२०२५ च्या दरम्यान उघडकीस आलेले आहे.

श्री. कांबळे, परिचर यांनी नियमित मासिक वेतनापेक्षा जास्तीची शासकीय रक्कम स्वत:चे बँक खात्यामध्ये जमा झालेनंतर सदरची बाब ही कार्यालय प्रमुखांचे निदर्शनास आणुन दिलेली नाही व जादा प्रदान झालेली रक्कम ही शासनास भरणा न करता ती स्वत:चे वैयक्तीक स्वार्थापोटी गैरमार्गाचा वापर करून गैरव्यवहार करणे, ही अत्यंत गंभीरबाब तपासणी पथकाचे निदर्शनास आलेली आहे. याबाबत संदर्भ क्र. २ नुसार श्री. कांबळे, परिचर यांना वसुली नोटिस देण्यात आली असून त्यांनी संशयीत अपहारीत रक्कम रू. ४९२०३०/- मात्र शासकीय लेखा शिर्षाखाली एकरकमी भरणा केलेली आहे. यावरून प्रशासनाची दिशाभुल करून व तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक यांचेशी संगणमत करून प्रा. आ. केंद्रास ऑनलाईन सेवार्थ प्रणाली मध्ये आर्थिक अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार करून व्यक्तीगत स्वार्थासाठी कर्तव्यात कसूर करून शासकीय निधीचा अपहार केला आहे. तसेच सदर बाबत बातमीपत्र व सोशल मीडिया यावर बातमी प्रसिद्ध होऊन शासनाची प्रतिमा मलीन करण्यास कारणीभूत ठरल्याने व शासकीय निधीचा अपहार केल्याने त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील ३ उल्लंघन केले आहे.

उक्त संदर्भ क्रं. ६ अन्वये श्री. कांबळे, परिचर यांचेविरुध्द दोषारोपपत्र बजाविण्यात आले असुन श्री. कांबळे, परिचर यांना दि. ०६/०४/२०२६ रोजी दोषारोपपत्र समक्ष बजाविण्यात आले असून संदर्भ क्रं. ७ अन्वये श्री. कांबळे, परिचर यांनी लेखी खुलासा सादर केला असुन त्यांचेवर ठेवण्यात आलेले दोन्ही आरोप त्यांनी अमान्य केलेले आहेत.

यास्तव श्री. कांबळे, परिचर यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे आवश्यक असल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील (६) च्या तरतुदीनुसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित

करण्यात आलेले आहे. सबब मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर उक्त नियमाच्या तरतुदीनुसार श्री. कांबळे, परिचर यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची चौकशी करणेकामी संदर्भ क्रं. ८ चे तरतुदीनुसार विशेष चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. सदर विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

तसेच संदर्भ क्रं. ९ चे तरतुदीनुसार प्रस्तुत विभागीय चौकशीकामी अहिल्यानगर जिल्हा परिषदेची बाजु मांडणे करिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन **श्री. नितीन चोथवे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती अकोले** यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याप्रमाणे संदर्भ क्रं. १ ते ७ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी. परिशिष्ट क्रं. ३ व ४ मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. वरीलकामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय **संकेतांक क्रं.** २०२६०५२००४०१०० असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 20-05-2026 20:46:53

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**प्रति,**

१. **विभागीय चौकशी अधिकारी तथा,**
**सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि प कर्मचारी)**
**आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक.**

२/- सोबत श्री. कांबळे, परिचर, प्रा. आ. केंद्र ब्राम्हणवाडा, ता. अकोले यांचे पत्रव्यवहार संचीका पृष्ठ क्रं.१ ते १२३ यासमवेत जोडले असुन विभागीय चौकशी करुन अहवाल सादर करावा.

२. **श्री. नितीन चोथवे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती अकोले**
**व्दारा व प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले.**

२/-सदर आदेश श्री. चोथवे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी व श्री. कांबळे, परिचर यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची पोहोच सादर करावी.

**प्रत :- १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले**
**२. वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र ब्राम्हणवाडा, ता. अकोले**
**३. कार्यासन आस्था-वेतन, सामान्य प्रशासन विभाग, जि. प. अहिल्यानगर**